# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 403/2022 दिनांक : 19.10.2022

## 1)घरफोडी :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 16.10.2022 रोजी 08.00 वा. ते दिनांक 17.10.2022 रोजी 07.00 वा. चे दरम्यान, **कृपा हर्बल कंपणी एमआयडीसी सिडको प्लॉट क्रं टी. 69 ता. जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने कृपा हर्बल कंपणी एमआयडीसी सिडको प्लॉट क्रं टी. 69 या गेटचे व पतऱ्याचे शेडचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून किर्लोस्कर कंपणीची ग्रॅंडरची चक्कीची एक विद्युत मोटार जु. वा. किंमती 15,000/—रूपयाची व जुनी 15 एचपीची किर्लोस्कर कंपणीची एक विद्युतमोटार किंमती 20,000/—रूपयाची व एक ग्रॅंडर मशीनचे पार्ट व बांधकामाचे लोखंडी प्लेट जुने वापरते किंमती 20,000/—रूपयाची असा एकुण 55,000/—रूपयाचा माल चोरून नेले. वगैरे **फिर्यादी आनंद कन्हैयालाल राठी, वय 46 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. सिडको ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 624/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2240 व्यवहारे, मो.क्रं. 9823827173** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :—** दिनांक 17.03.2022 रोजी 20.30 वा. ते दिनांक 18.10.2022 चे 07.30 वा. चे दरम्यान, **तिरूमला नगर वाडी बु. ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई ही तीचे घराला कुलूप लावुन तिचे आईचे घरी गेली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने तिचे घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने व नगदी असा एकुण 65,095/—रूपयाचा माल चोरून नेले आहे. वगैरे **फिर्यादी सुप्रिया राम पावडे, वय 35 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. तिरूमला नगर वाडी बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 378/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/51 जाधव, मो.क्रं. 9067952076** हे करीत आहेत.

**3)धर्माबाद :—** दिनांक 18.10.2022 रोजी 02.00 ते 04.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरात आनंदनगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा भाडयाने राहात असलेल्या आनंदनगर धर्माबाद येथील घराचे दरवाजाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाने तरी कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधील लॉक नसलेल्या प्लायवुड कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले नगदी 1,00,000/—रूपये व सोन्याचे दागीने असा एकुण 2,24,000/—रूपयाचा ऐवज चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी सुधाकर मनोहरराव पाटील, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी अभियंता रा. जुनी ह. मु. दिगांबर पुवार यांचे घर क्रमांक 12 मध्ये आनंदनगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 230/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वाडेकर, मो.क्रं. 99067081223** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :—

**1)विमानतळ :—** दिनांक 19.09.2022 रोजी 12.15 ते 12.30 वा. चे दरम्यान, **सिध्दीविनायक हॉटेलचे समोर आसना टी पॉंईंट नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्प्लेंडर प्लस कंपणीची मो. सा. क्रं एमएच—14/एचएस—4766 किंमती 50,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गणेश शेषेराव कदम, वय 28 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. निळा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 356/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/पावडे, मो.क्रं. 8888842002** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :—

**देगलुर** :— दिनांक 16.10.2022 रोजी चे 23.00 ते दि. 17.10.2022 चे 05.00 वा. चे दरम्यान, **जनावराचे गोठयातुन समर्थनगर भक्तापुररोड देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची गोठयात बांधलेली एक गाय किंमती 40,000/—रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी रवींद्र दिगंबरराव चिंचाळकर, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. समर्थनगर भक्तापुर रोड देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 484/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)चोरी :—

**1)उस्माननगर** :—दिनांक 10.10.2022 रोजी 23.00 ते 23.30 वा. चे दरम्यान, **मौ. दाताळा ता. कंधार येथील इंडस कंपणीचे टावर मध्ये ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून दाताळा येथील इंडस कपंनीचे टावर मधील टीआरएस सहा नग व डुप्लेक्स किंमती अंदाजे 35,000/—रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी मधुकर रमेश गायकवाड, वय 27 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. शिवराम नगर परभणी ता. जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 176/2022 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2536 राठोड, मो.क्रं. 8378989949** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :—

**1)उमरी** :—दिनांक 15.10.2022 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **मौ. शेलगाव शिवारात ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून तुम्ही शेतातील सोयाबीन का घेवुन जात आहात म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादीचे सासरे यास थापड बुक्यांनी मारहाण करून खाली पाडले हातातील कुऱ्हाडीने त्यांचे उजवे पायाचे फेन्ड्रीवर मारून दुःखापत केली. तसेच लोखंडी रॉडने उजव्या खांद्यावर मारून फॅक्चर केले. तसेच फिर्यादी हा सोडविण्यास गेला असता लाकडाने डाव्या हाताच्या मनगटावर बकाळीत मारून गंभीर जखमी केले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी गोविंद राजेश्वर खदगावे, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. शेलगाव ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 249/2022 कलम 325, 324, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1982 सरोदे, मो. नं. 7038833358** हे करीत आहेत.

**2)बारड** :—दिनांक 17.10.2022 रोजी 06.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी पांढरवाडी ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा आपल्या घरा समोरील चौकात थांबला असता यातील आरोपी हा त्याचे जवळ जाऊन त्याला म्हणाला माझ्या बांधकामाचा सजा बाहेर रस्त्यावर आला आहे. असे तु विनाकारण म्हणत आहे. तुला दाखवतो असे ओरडुन बांधकामा जवळ पडलेली लोंखडी सळई, रॉड, घेऊन फिर्यादीच्या पाठीवर व उजव्या पायावर जबर मारहाण केल्याने उजवा पाय फॅक्चर झाला आहे. वगैरे **फिर्यादी धोंडीबा किशन नवाटे, वय 54 वर्षे, व्यवसाय शेती रा. पांढरवाडी ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरन 75/2022 कलम 326, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री तुगावे, मो. नं. 9822179877** हे करीत आहेत.

## 4)आत्महत्येस प्रवृत केले :—

**विमानतळ** :—दिनांक 17.10.2022 रोजी 06.00 पुर्वी, **माळटेकडी नांदेड येथे,** यातील **मयत नामे दुर्गाबाई भ्र. परमेश्वर वडजे, वय 20 वर्षे, रा. माळटेकडी नांदेड,** हीस तिचे सासरचे लोक आरोपीतांनी संगणमत करून मयत बाईस तुझे माहेरहुन धंदा टाकण्यासाठी एक लाख रूपये घेवुन ये म्हणुन, तसेच तुला स्वयपाक येत नाही तु अपशकुनी पालत्या पायाची आहे. असे म्हणत थापडबुकयांनी मारहाण करून शिवीगाळ करत हिणवुन यातील नमुद चार आरोपीतांचे त्रासाला कंठाळुन गळफास घेवुन आत्महत्या केली. यातील नमुद आरोपीतांनी आत्महत्येस प्रवृत केले. वगैरे **फिर्यादी कामाजी चंदर कदम, वय 58 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 357/2022 कलम 306, 498(अ),504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गौड, मो.नं. 7972560742** हे करीत आहेत.

## 5)जुगार :—

**1)मुखेड** :— दिनांक 18.10.2022 रोजी 17.35 वा. चे सुमारास, **मुखेड ते बाऱ्हाळी जाणारे रोडवरील जय महाराष्ट्र धाब्याचे पाटीमागील मोकळया जागेत ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 7100/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गजानन विजय अन्सापुरे, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 313/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/भारती, मो.क्र. 9764174307** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 17.10.2022 रोजी 21.50 वा. चे सुमारास, **करडखेड ते मरखेल जाणारे रोडवर नागनाथ रामा वंकलवार यांचे घराचे बाजुला मोकळया जागेत ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद बारा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 10,300/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री श्रीकांत माधवराव मोरे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 483/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2332 पल्लेवाड, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

**3)वजिराबाद :–** दिनांक 18.10.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **कलामंदीर ते जेलकडे जाणारे रोडवर शर्मा किराणा दुकाना समोर वजिराबाद नांदेड येथे,** यातील नमुद बारा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 3500/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री जसवंतसिंह हुजूरासिंह शाहु, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 368/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1020 आडे, मो.क्र. 9823467191** हे करीत आहेत.

**4)वजिराबाद :–** दिनांक 18.10.2022 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **वाघी रोड महेमुदखान गार्डनच्या बाजुस मोकळया जागेत ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार क्लोज नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 2500/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2085, विजयकुमार कुरमया नंदे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 367/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1020 आडे, मो.क्र. 9823467191** हे करीत आहेत.

## 6)विज पडुन मृत्यु :–

**1)हिमायतनगर :–**दिनांक 18.10.2022 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **मौ. शिबदरा शिवार रामेश्वर गणपत भाडेवाड यांचे शेतात ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सुनिल साहेबराव वायकोळे, वय 35 वर्षे, रा. वारंग टाकळी ता. हिमायतनगर जि. नांदेड,** हा व साक्षीदार हे मारोती रामलु मद्येवाड यांचे शेतात हेडंबा ट्रॅक्टरवर सोयाबीन काढण्यासाठी मजुरी ने गेले होते दुपारी 13.00 वा. चे सुमारास शेतात काम करून हेडंबा ट्रॅक्टर गावाकडे परत येत असतांना रामेश्वर गणपत मद्येवाड यांच्या शेताजवळ आले असता अचानक मेघगर्जनेसह पाऊस सुरू झाला व विजेचा कडकडाट होऊन अंगावर विज पडुन मरण पावला. वगैरे **खबर देणार अवधुत विश्वनाथ कदम, वय 47 वर्षे, व्यवसाय पोलीस पाटील रा. वारंगटाकळी ता. हिमायतनगर जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** आ. मृ. 42/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोनि/श्री भुसनूर, मो.नं. 9834774799** हे करीत आहेत.

**2)लोहा :–**दिनांक 18.10.2022 रोजी चे 15.15 वा. चे सुमारास, **मधुकर किशन पवार रा. धावरी तांडा यांचे शेतात ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1)माधव पिराजी डुबूकवाड, वय 45 वर्षे, रा. पानभोसी ता. कंधार जि. नांदेड, 2)पोचप्पा उर्फ पोचीराम शामराव गायकवाड, वय 48 वर्षे, रा. पेठपिंपळगाव ता. पालम जि. परभणी** 3)**रूपाली पोचप्पा उर्फ पोचीराम शामराव गायकवाड, वय 16 वर्षे, रा. पेठपिंपळगाव ता. पालम जि. परभणी** यांनी मधुकर किशन पवार रा. धावरी तांडा यांची बटाऊने शेती करण्या करीता घेतली होती. सदर शेती मध्ये ऊस तोडणी करीता काम करीत असतांना त्यातील काही कामगार लिंबाचे झाडाखाली बसले तेव्हा अचानक पाऊस सुरू होऊन कडाक्याची विज त्यांच्या अंगावर विज पडल्याने त्यांना तात्काळ 108 क्रमांकाचे ॲम्ब्युलन्सने शासकीय रूग्णालय लोहा येथे आणले असता त्यांना डॉक्टरांनी मयत घोषीत केले. वगैरे **खबर देणार केशव भीमराव वाकडे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. धावरी ता. लोहा जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे लोहा** आ. मृ. **34**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोनि/श्री संतोष तांबे, मो.नं. 9850188100** हे करीत आहेत.

## 7)विषारी साप चावुन मृत्यु :–

**मांडवी :–**दिनांक 17.10.2022 रोजी चे 14.00 वा. चे पुर्वी, **मौ. सक्रुनाईक तांडा शिवारात ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रल्हाद फतु चव्हाण, वय 56 वर्षे, रा. सक्रुनाईक तांडा ता. किनवट जि. नांदेड,** हा त्याचे शेतामध्ये पिकावर फवारणी करीत असतांना सर्पदंश झाल्याने त्याला उपचार कामी ग्रामीण रूग्णालय उमरी बा. येथे शरीक केले असता डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषीत केले. वगैरे **खबर देणार पुंडलीक फतु चव्हाण, वय 53 वर्षे, रा. सक्रुनाईक तांडा शिवारात ता. किनवट जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भोकर** आ. मृ. 08/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/कराड, मो.नं. 9552500385** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड